| | | |
|---|---|---|
| | **पोलीस आयुक्तालय**<br>**मिरा-भाईंदर, वसई-विरार**<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं. ०२२-२९४५१००१ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**बांधकाम व्यवसायिकाची गोळ्या झाडून हत्या करणाऱ्या अज्ञात आरोपीतांना अटक करुन गुन्हा उघडकीस आणणाऱ्या गुन्हे शाखेतील व पोलीस स्टेशनच्या ७६ पोलीस अधिकारी/ अंमलदार यांचा माहे 'मार्च महिन्यातील उत्कृष्ठ तपास' म्हणून पोलीस आयुक्तांनी केला सत्कार.**

दिनांक २६/०२/२०२२ रोजी १३.२५ वा. चे सुमारास श्रीकृष्ण फर्निचर समोरील रोडवर, भाजीपाला मार्केटच्या बाहेर, ९० फुट रोड, मनवेलपाडा, विरार पु. या ठिकाणी निशांत कदम याच्या खुनाचा बदला घेण्यासाठी अज्ञात आरोपीतांनी कटकारस्थान रचून समरजीत उर्फ समय चौहान याचा खुन करण्याची सुपारी मारेकऱ्यांना देऊन रिव्हॉल्वरने फायरिंग करुन खुन केला होता. त्याबाबत विरार पोस्टे गु.रजि.नं I २३२/२०२२, भा.द.वि.स. कलम ३०२, १२०(ब), सह भा.ह.का. कलम ३, २५, २७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी घटनास्थळास भेट देवून गुन्हे शाखेतील व विरार पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांना गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेवून सदरील गुन्हा उघडकीस आणण्याबाबत सुचना दिल्या व सदरील तपासाकरिता विविध पथके तयार करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे शाखा, युनिट क्र १, २, ३ च्या व विरार पोलीस स्टेशनच्या अधिकारी/अंमलदार यांनी घटनास्थळावर जावून अज्ञात आरोपीतांबाबत प्राथमिक माहिती तसेच तांत्रीक पुरावे हस्तगत केले. मिळालेल्या माहितीच्या आधारे दोन आरोपीतांचा मागोवा घेत आरोपीतांनी गुन्हयातील ओसवाल नगरी येथे सोडुन दिलेली मोटार सायकल निष्पन्न केली. सदर गुन्हयातील आरोपी हे

मोटार सायकल सोडुन दिल्यानंतर मोरेगाव रिक्षा स्टँडवरुन रिक्षा पकडुन वसई फाटा येथे पोहचले व वसई फाटा येथुन दुसरी रिक्षा पकडुन बोरीवली येथे गेले व तेथुन तिसरी रिक्षा पकडुन अंधेरी पंप हाऊस मालपा डोंगरी, अंधेरी येथे गेल्याचे समजुन आले होते.

गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेणेकामी तपास पथकाने छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ टि-१ व टि-२ या ठिकाणावरुन मुंबई ते वाराणशी, प्रयागराज, गोरखपुर, लखनौ येथे जाणारी विमानामधील प्रवाशी यांची दिनांक २६/०२/२०२२ ते २७/०२/२०२२ रोजी पावेतोची माहिती प्राप्त केली. तसेच लोकमान्य टिळक टर्मिनस, कुर्ला येथील दिनांक २७/०२/२०२२ रोजीचे सकाळी ०८.०५ ते रात्रौ २३.३५ वा पावेतो भागलापुर एक्सप्रेस, गोदान एक्सप्रेस, कामयानी एक्सप्रेस, बनारस एक्सप्रेस, पाटलीपुत्र एक्सप्रेस येथे जाणाऱ्या रेल्वे प्रवाशांबाबत माहिती घेतली. त्याचप्रमाणे गुन्हयातील आरोपीतांचा शोध होणेकामी संशईतांचे फोटो समाजमाध्यमे व परिसरामध्ये प्रसिध्द केले. त्यानंतर सदर गुन्हयातील आरोपीत नामे १) राहुल विरेंद्र शर्मा उर्फ राम रा. बरवाना, पो.स्ट कपसेठी, ता. पिंडरा, जि. वाराणसी, राज्य उत्तर प्रदेश यास प्रथम ताब्यात घेण्यात यश आले. तद्नंतर गुन्हयातील इतर आरोपीतांचा सहभाग निष्पन्न करुन सर्वांना अटक करुन सदरचा क्लिष्ट गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरील गंभीर खुनाच्या गुन्हयाचा तपास करतांना सुरुवातीला कोणताही धागादोरा नसतांना तपास पथकातील ७६ पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हा घडल्यापासून वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सातत्याने मेहनत करुन व अत्यंत कौशल्यपुर्वक तपास करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणुन यातील आरोपीतांना अटक केली आहे. सदरच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते यांनी तपास पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अभिनंदन करुन माहे मार्च २०२२ मधील 'उत्कृष्ट गुन्हयाची उकल' म्हणून पथकातील अधिकारी व अंमलदार यांना मासिक गुन्हे आढावा बैठकीचेवेळी प्रशस्तीपत्र व बक्षिस देवून गौरविले आहे.